# आरोपीचा बनाव उघड पोलीसांनी केला खुनाचा उलघडा

■अकोट,दि ९ (प्रतिनिधी)

हकीकत अशा प्रकारे आहे की, दिनांक ०७.१२.२०२५ रोजी आरोपी नामे पवन लक्ष्मण इंगळे वय २७ वर्ष रा.महेश कॉलनी अकोट जि. अकोला हा रात्री अंदाजे ०९.०० वाजताचे सुमारास पोलीस स्टेशन ला आला व त्याने पोलीसांना माहीती दिली की, त्याचे सोबत मागील काही वर्षापासुन राहत असलेल्या महीलेने त्याचे राहते घरात गळफास घेवुन आत्महत्या केली आहे. अशा माहीती वरून पोलीस स्टेशन चे ठाणेदार श्री अमोल माळवे पोलीस उपनिरीक्षक श्री निलेश बारहाते, एएसआय श्री अनिल वक्टे व पोलीस स्टाफ तात्काळ घटनास्थळी जावुन सदर ठिकाणचा पंचनामा करून महीलेच्या प्रेतास पि.एम.कामी ग्रामीण रूग्णालय अकोट येथे ठेवुन सदर प्रकरणी मर्ग क्रमांक ३४/२५ कलम १९४ बिएनएसएस प्रमाणे दाखल केला.त्यानंतर काल दिनांक ०८.१२.२०२५ रोजी सदर मर्ग चे तपासा दरम्यान पवन लक्ष्मण इंगळे याने महीलेच्या केलेल्या आत्म हत्येच्या बनाव अनुषंगाने पोलीसांनी आपल्या कौशल्याचा उपयोग करून कसोशीने तपास केला असता सदर चे प्रकरण हे संशयास्पद



असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने तसेच वैदयकिय अधिकारी, अकोट यांचे कडुन मृतक महीलेचा पि.एम रिपोर्ट प्राप्त केला असता त्यामध्ये मृतक महीलेचा गळा आवळयाने मृत्यु झाले बाबत अभिप्राय असल्याने आरोपी पवन लक्ष्मण इंगळे यास ताब्यात घेवुन त्यास बारकाईने विचारपुस केली असता त्याने मृतक महीलेचा गळा आवळुन खुन केल्याची कबुली दिली वरून सदर प्रकरणी मृतक महीलेचे भावाचे बयाणावरून अप.नं. ४८४/२५ कलम १०३(१) भारतीय न्याय संहीता प्रमाणे दाखल करून तपासात घेतला व आरोपी पवन लक्ष्मण इंगळे वय २७ वर्ष रा.महेश कॉलनी अकोट जि. अकोला यास अटक करण्यात आली आहे.

सदर ची कामगिरी ही मा. पोलीस अधिक्षक श्री अर्चित चांडक, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री बी. चंद्रकांत रेडडी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री सुदर्शन पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री अमोल माळवे, पोलीस उपनिरीक्षक निलेश बारहाते, वैभव तायडे, एएसएस अनिल वक्टे, पोहेकॉ नंदकिशोर कुलट नापोका विपुल सोळंके, पोकॉ विशाल दारोकार, चालक पोकॉ संदीप तायडे, सुरेश माकोडे यांनी केली.

## गॅरेजच्या खोक्याला लटकलेला मृतदेह

■मुर्तिजापुर,दि. ९ (प्रतिनिधी)

मृताची ओळख मूर्तिजापूर तालुक्यातील मुंगशी येथील सतीश रामदास गवई (वय ५२) अशी झाली आहे. ही घटना आत्महत्या की हत्या याबद्दल मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. मृताच्या कुटुंबीयांनी संशय व्यक्त करत हा मृत्यू संशयास्पद असल्याचे सांगितले आहे. अकोला जिल्ह्यातील म्हैसांग येथील टी-पॉईंट परिसरात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बंद पडलेल्या गॅरेजच्या खोक्याला एका व्यक्तीचा लटकलेला मृतदेह आढळताच गावात एकच खळबळ उडाली.

## १३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतचे आयोजन

■अकोला,दि ९ (प्रतिनिधी)

राष्ट्रीय विधी सेवा प्राधीकरण नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधीकरण, मुंबई यांच्या सुचनेनुसार राष्ट्रीय लोकअदालतचे आयोजन शनिवार १३ डिसेंबर रोजी अकोला जिल्हा न्यायालय व सर्व तालुका न्यायालयामध्ये सकाळी १० :३० ते संध्याकाळी ५:३० दरम्यान करण्यात येणार आहे .न्यायालयात प्रलंबीत असलेले दावे तडजोडीने आणि सामंजस्याने निकाली निघावेत यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या लोक अदालतीमध्ये दावा निकाली काढता येणार आहे.

यामध्ये धनादेश अनादर प्रकरणे,बँकेचे कर्ज वसुली प्रकरणे,कामगारांचे वाद,विद्युत आणि पाणी देयक बदलने प्रकरणे, (आपसात तडजोड करण्याजोगे प्रकरणे वगळून)फौजदारी प्रकरणे, वैवाहिक आणि इतर दिवाणी वाद),आपसात तडजोड करण्याजोगे फौजदारी प्रकरणे,धनादेश अनादर प्रकरणेबँकेचे कर्ज वसूली प्रकरणे,मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे,वैवाहिक वादकाम गारांचे वाद,भुसंपादन प्रकरणे,सेवा विषयक पगार, भत्ते व सेवा निवृत्तीचे फायदेविषयक प्रकरणे,इतर दिवाणी प्रकरणे (भाडे, वहिवाटीचे हक्क, मनाई हुकूमाचे दावे, विशिष्ट पूर्वबंध कराराची पूर्तता विषयक वाद इत्यादी प्रकरनाचा निपटारा करण्यात येणार आहे.

तरी उपरोक्त फायदे विचारात घेता ज्या पक्षकारांची न्यायालयात प्रलंबित आहेत अथवा न्यायालयात दाखल व्हावयाची आहेत (दाखलपूर्व प्रकरणे) त्याना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला तर्फे आवाहन करण्यात येते आहे की, त्यांनी आपली प्रलंबीत व दाखलपूर्व प्रकरणे सदर राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवण्याकरिता संबंधित न्यायालयातील तालुका विधी सेवा समिती अथवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा आणि सदर राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये सहभागी होऊन आपले वाद समोपचाराने कायमने मिटवावेत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस. बी. कचरे व सचिव आर. एन. बंसल यांनी केले आहे.

## मिथुन राशीतून उल्कांचा वर्षाव

■अकोला,दि ९ (प्रतिनिधी)

आकाशात अचानक एखादी प्रकाश रेखा क्षणार्धात चमकून जाते, आपण त्याला तारा तुटला असे समजतो.प्रत्यक्षात ती उल्का असते.पृथ्वी कक्षेत जेंव्हा धूमकेतू, लघू ग्रह आदींचे मार्गक्रमणातील वस्तूकण गुरुत्वाकर्षणामुळे ओढले जातात आणि पृथ्वी वातावरणातील घर्षणामुळे ते पेटतात आणि विविधरंगी प्रकाश आपणास दिसतो.याचा प्रत्यक्ष ताऱ्याशी काहीही संबंध नसतो.

पृथ्वीकक्षा आणि या सूटलेल्या वस्तू जेव्हा जवळ येतात तेंव्हा असे उल्का वर्षाव नुसत्या डोळ्यांनी पाहता येतात.दि.१३ व १४ डिसेंबर रोजी मिथुन राशीतून उल्कांचा वर्षाव बघता येईल या आकाशातील मनोहारी खेळाचा आनंद आकाश प्रेमींनी अवश्य घ्यायला हवा असे आवाहन विश्वभारती केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांनी केले आहे.

यापूर्वी सूर्यकुलाचा घटक असलेला फेथेन या लघुग्रहाचे वस्तूकण दि.१३ व १४ चे रात्री नऊ वाजता नंतर पूर्व आकाशात लाल, पिवळ्या, हिरव्या, पांढऱ्या




रंगाच्या उल्का पहाटे पर्यंत पाहता येतील. त्यासाठी कमी प्रकाश वा अधिक अंधाऱ्या जागेतून हा आकाश नजारा पाहता येईल.

यावेळी मार्गशीर्ष दशमी व एकादशी असल्याने आकाशात चंद्र उशिरा दाखल होणार त्यामुळे या उल्का वर्षावाचा आनंद अंधाऱ्या रात्री अधिक चांगल्या पद्धतीने घेता येईल.यासाठी झोपलेल्या अवस्थेत पूर्व क्षितिजावर मृग नक्षत्राच्या बाजूला आपल्या सूर्यमालेतील सर्वात मोठ्या असलेल्या गुरू ग्रहाच्या जवळ मिथुन राशीतील कॅस्टर व पोलूक्स या दोन ताऱ्यांच्या साहाय्याने याचा आनंद घेता येईल.जसजशी रात्र होईल

तसतसा उल्कांचा वेग वाढत जाऊन उत्तररात्री २ ते ३ या सूमारास तो दर ताशी १२० पर्यंत जाण्याची शक्यता आहे विविध रंगांच्या या प्रकाश रेखा त्या वस्तूकणांतील घटका नुसार वेगवेगळ्या रंगांत पाहता येतील.थंडीच्या दिवसात हा अनोखा आकाश खेळ अवश्य अनुभवून गुरू ग्रह, जवळच दिसणाऱ्या दोन ताऱ्यांच्या सहवासात घ्यायला हवा.हे दोन तारे पुनर्वसू नक्षत्राचे आहेत.

इकडे उल्कांचा नजारा मस्त तर तिकडे शूक्र ग्रहाचा अस्त✻ होत आहे.आजवर पहाटे पूर्व आकाशाची शोभा वाढविणारा तेजस्वी शूक्र सूर्य सान्निध्यात येत असल्याने पूर्वेस अस्त होऊन दिर्घ कालावधीनंतर १ फेब्रुवारी पासून पश्चिम आकाशात पुन्हा दर्शनासाठी सज्ज असेल.

## थोडक्यात

### ठिबक, तुषार सिंचनासाठी त्वरित महाडीबीटीवर अर्ज करा

**बाळापूर :** पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा योग्य वापर करण्यासाठी आणि शेतीत आधुनिक सिंचन पद्धतीचा अवलंब करण्यासाठी तालुका कृषी अधिकारी बाळापूर यांनी तालुक्यातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन आणि तुषार सिंचन संचाच्या अनुदानासाठी महाडीबीटी पोर्टलवर त्वरित ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. केंद्र पुरस्कृत 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना', 'प्रति थेंब अधिक पीक' या घटकांतर्गत सूक्ष्म सिंचनासाठी अनुदान दिले जाते. ज्या अनुसूचित जाती आणि जमाती प्रवगार्तील शेतकऱ्यांनी अद्याप अर्ज केलेला नाही, त्यांनी या महत्त्वपूर्ण योजनेचा लाभ घ्यावा. यासाठी संकेतस्थळावरील 'शेतकरी योजना' या पर्यायावर जाऊन अर्ज करावा. सोबतच ७/१२ उतारा, ८-अ दाखला, आधार कार्ड, बैंक पासबुक, जातीचा वैध दाखला आणि सिंचन सुविधेची नोंद / स्वयंघोषणापत्र सादर करावे. अर्ज करताना आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. पाणी बचतीसह शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी सूक्ष्म सिंचन प्रणाली अत्यंत उपयुक्त आहे. त्यामुळे, पात्र शेतकऱ्यांनी शेवटच्या क्षणी होणारी गर्दी टाळून, तत्काळ अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी आणि शासकीय अनुदानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी, बाळापूर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही ते म्हणाले.

### मोफत नेत्र तपासणी शिबिर

**अकोला :** डोळे हा मानवी शरीरातील सर्वात संवेदनशील आणि महत्त्वाचा अवयव असल्याने त्यांची योग्य काळजी घेणे अत्यावश्यक आहे, असे मत ख्यातनाम नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रदीप अग्रवाल यांनी व्यक्त केले. वाढता मोबाइल वापर, स्क्रीनकडे सतत पाहण्याची सवय आणि विश्रांतीचा अभाव यामुळे डोळ्यांवर घातक परिणाम होत असून, लहान वयातच नंबर वाढणे, कोरडेपणा, ताण आणि डोकेदुखीच्या तक्रारी वाढत आहेत. वेळोवेळी तपासणी, स्क्रीन टाइम कमी करणे आणि डोळ्यांना विश्रांती देणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठानतर्फे आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात त्यांनी रुग्णांना मार्गदर्शन केले. या शिबिरात डॉ. उमेश गडपाल, डॉ. अविनाश तेलगोटे, डॉ. अमोल भगत, डॉ. प्रदीप अग्रवाल, डॉ. सतीश पडघन, डॉ. विनीत वरठे, डॉ. प्रज्ञा बरते, डॉ. विवेक शेगावकर, डॉ अमित गवई, डॉ. आशिष कोकणे, डॉ. विजय दाम ले, डॉ. रुपेश तायडे आदी.

## १ लाखाचा चायनीज मांजा जप्त

अकोला : शहरातील पोलिस स्टेशन डाबकी रोड हद्दीत होत असलेल्या चायनीज मांजा विक्रीच्या ठिकाणी छापा टाकून पोलिसांनी १ लाख रुपये किमतीचा चायनीज मांजा व इतर साहित्य जप्त केले. दीपक कोळी यांच्या मार्गदर्शनात मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे त्यांनी त्यांचे अधिनस्तअसलेल्या डी. बी. पथकाने देवकाबाई नगर, बाळापूर नाका, डाबकी रोड अकोला येथे छापा टाकून आरोपी ओम सुनिल देशमुख , रा. देवकाबाई नगर, डाबकी रोड, अकोला यांच्या ताब्यातून २०० चायनीज मांज्याचे बंडल व रोख रक्कम जप्त केली.

## मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या हस्ते २७ नवीन कचरा घंटा गाड्यांचे लोकार्पण सपंन्न

■अकोला,दि ९ (प्रतिनिधी) :

अकोला महानगरपालिका क्षेत्र हे संपुर्ण कचरामुक्त करण्याच्या दृष्टीने मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये अर्बन एनवायरो वेस्ट मैनेजमेंट लिमिटेड या कपंनीला कचरा संकलन करण्याचे कंत्राट देण्यात आले आहे. तसेच अकोला शहरातील घरगुती व व्यावसायिक प्रतिष्ठानातून दैनंदिन कचरा संकलन करण्यासाठी संबंधीत कंत्राटदाराला मनपाच्या १०० कचरा घंटा गाडी देण्यात आल्या होत्या परंतू संपुर्ण शहरातील घरगुती व व्यावसयिक प्रतिष्ठानातून दैनंदिन कचरा उचलण्यासाठी सदरचे वाहन कमी पडत



असल्याने करारनाम्यानुसार वाहनांची संख्या वाढविण्याच्या सुचना संबंधीत कंत्राटदाराला देण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने दि. ०९ डिसेंबर २०२५ रोजी कंत्राटदाराकडून दुसरा टप्पा म्हणून २७ नवीन कचरा घंटा गाड्या आणण्यात आल्या असून मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या हस्ते सदर गाड्यांचे पूजन, फीत कापून तसेच हिरवी झेंडी दाखवून लोकार्पण करण्यात आले आहे. अकोला शहरामधील प्रत्येक घरातून कचरा उचलला गेलाच पाहिजे यामध्ये कोणत्याही प्रकारची हलगर्जी होणार नाही या दिशेने कार्य करणे, तसेच यापुढे शहरात, परिसरात, गल्लीबोडात कचरा दिसणार नाही याची खबरदारी घ्यावी आदि सुचना यावेळी मनपा आयुक्त यांनी संबंधितांना दिली.

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी तसेच व्यावसायिक प्रतिष्ठान धारकांनी आपल्या घरात व प्रतिष्ठानात निघणारा ओला व सुका कचरा वेग-वेगळा गोळा करून परिसरात ईतरत्र न टाकता फक्त मनपाच्या कचरा घंटा गाडी मध्येच कचरा टाकून आपले शहर स्वच्छ व सुंदर बनविण्याच्या कामामध्ये आपले मोलाचे सहकार्य करावे.

## पदवीधर मतदार संघाची नोंदणी सुरु तसेच मनपा इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधण्याचे आवाहन

■अकोला,दि ९ (प्रतिनिधी) :

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षातर्फे पदवीधर नोंदणी सुरु करण्यात आलेली असून पदवीधर मतदारसंघाकरिता इच्छुक असलेल्या उमेदवारांनी तसेच आगामी अकोला म हानगरपालिका निवडणुकीकरिता इच्छुक असलेल्या उमेदवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) गटाकडून इच्छुकांनी संपर्क साधण्याचे आवाहन



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे पदवीधर सेलचे शहर अध्यक्ष नरेंद्र व्हि. देशमुख यांनी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या आदेशान्वये केले आहे.

## नवजात बालकांसह कुटूंबाला मिळाला निवारा : न्यायधीशांची तत्परता

■अकोला,दि ९ (प्रतिनिधी) :

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अकोला सचिव मा न्या. रोशनी बन्सल मॅडम यांनी भ्रमनध्वनी द्वारे दिलेल्या माहितीनुसार एक नवजात शिशू पालकांसह जिल्हा स्त्री रुग्णालय समोर गजानन महाराज मंदिर च्या जवळ थंडीच्या कडाक्यात वास्तव्यास आहे अशी माहिती दिली त्यानुसार तात्काळ दखल घेत मा. बाल कल्याण समिती अकोला सदस्य प्रांजली जैस्वाल यांच्या मार्गदर्शनात त्या नवजात शिशू व कुटुंबाला बेघर निवारा येथे तात्पुरता निवारा उपलब्ध करून दिला आणि सदर कुटुंबाची अडचण जाणून घेऊन त्यांना आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले सदर उपक्रमात मा न्या श्रीमती रोशनी बन्सल दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर



तथा सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अकोला, मा प्रांजली जैस्वाल सदस्य बाल कल्याण समिती अकोला महिला व बालविकास विभाग अंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे सुनील लाडुलकर, एन्करेज एज्युकेशनल फाउंडेशन अकोला चे अध्यक्ष महेंद्र गणोदे आणि सदस्य कैवल्य जैस्वाल आणि कपिल बहाळ हे उपस्थित होते.

## सवलतीस पात्र नवउद्योजकांना मार्जिन मनी बाबत अर्ज करण्याचे आवाहन

■अकोला,दि ९ (प्रतिनिधी) :

केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील योजनेमध्ये पात्र ठरलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या घटकांककरीता सवलतीस पात्र नवउद्योजक लाभार्थ्यांची मार्जीन मनी भरण्याची क्षमता नसल्यामुळे या नवउद्योजक लाभार्थ्यांना एकूण प्रकल्प किमतीच्या लाभार्थी यांच्या हिश्यामधील २५ टक्के मधील जास्तीत जास्त १५ टक्के मार्जीन मनी उपलब्ध करून देण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या घटकांम धील सवलतीस पात्र नवउद्योजक लाभार्थी यांनी प्रकल्प रकमेच्या १० टक्के स्वहीस्सा भरणा केल्यानंतर व कर्ज मंजूर करणा-या बंकीने अर्जदारास स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर उर्वरित फ्रंट एंड सबसिडी १५ टक्के राज्य शासनामार्फत देण्यात येईल. सदर योजनेचा लाभ स्टँड अप इंडिया योजने अंतर्गत पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांनाच देण्यात येईल, त्यासाठी संबंधित लाभार्थी यांनी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांच्याकडे बँकेच्या शिफारशीसह शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दिनांक ८ मार्च २०१९, दि. ०९ डिसेंबर २०२० व दि. २६/०३/२०२१. निर्णयातील परिशिष्ट मध्ये विहित केलेल्या विवरणपत्रात कर्ज मंजूर करणा-या बँकेच्या शिफारशीसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे, अर्जासोबत उद्योग आवश्यक ते सर्व कागदपत्र पत्र जोडणे आवश्यक आहे. करिता सदर योजनेस पात्र लाभार्थी यांनी विहित नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरून वर नमूद कागदपत्रासह बँकेच्या शिफारशीसह सहायक आयुक्त समाज कल्याण आकोला या कार्यालयास सादर करावे,असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांचेमार्फत करण्यात येत आहे.

## पाटील समाज अकोलाचे वतीने भव्य वधू वर परिचय मेळावा संपन्न

■अकोला,दि ९ (प्रतिनिधी) :

पाटील समाज अकोलाचे वतीने आज स्थानिक जानोरकर मंगल कार्यालयात उपवर मुला मुलींचा परिचय मेळावा मोठ्या उपस्थितीत संपन्न झाला. आजच्या मेळाव्यात अकोला जिल्ह्यातील व जिल्हा बाहेरील सुद्धा एकूण ६७२ उपवर मुला मुलींची नोंदणी करण्यात आली. यात ४०२ मुले व ३७० मुलींचा समावेश आहे.मेळाव्याचे प्रारंभी पाटील समाज अकोला चे अध्यक्ष अशोकराव अमानकर व इतरही मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराज तसेच राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर पाटील समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा वैशाली बाहाकर, सचिव ॲड. दिपाली जानोरकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी पसायदान सादर केले.प्रारंभी पाटील समाजाचे सचिव प्रदीप खाडे यांनी प्रास्ताविक करून मेळाव्याची गरज तसेच मराठा समाजाची दिशा व दशा यावर समयोचित मार्गदर्शन केले. अध्यक्ष अशोकरावअमानकर यांनी आपले मनोगत व्यक्त करून मराठा समाजाच्या एकत्रीकरणाची गरज प्रतिपादित केली. समाजातील मुला मुलींची घटती संख्या यावरही त्यांनी चिंता व्यक्त करून फाजिल अपेक्षा न बाळगता योग्य वयातच मुला मुलींचे विवाह करा असा मौलिक सल्ला दिला. संमेलनास



उपस्थित असलेल्या उपवर मुला मुलींनी उपस्थितां समोर आपला परिचय सादर केला. ज्यांची मुले मुली या मेळाव्यासाठी उपस्थित राहू शकले नाहीत त्यांच्या पालकांनी परिचय पत्रांचे वाचन केले. मेळावा करिता प्रामुख्याने प्राचार्य सुभाषराव भडांगे, डॉ. सुभाष कोरपे, डॉ. गजानन नारे, जगदीश मुरूमकर, विनोद मापारी, मंगेश काळे, विठ्ठलराव सरप, पंकज साबळे, सुधाकर खुमकर, उपविभागीय अधिकारी शरद जावळे, शंकरराव वाकोडे, पंकज जायले, नचिकेत चोपडे, सुरेश पाटील, योगिता पावसाळे, पद्माताई अहेरकर, सुनिता मेटांगे, गणेशराव पावसाळे, अनिता भालतीलक, ॲड. मोहनराव अहेरकर, शरद वानखडे, वसंत पोहरे यांचे सह इतरही मान्यवर उपस्थित होते. पाटील समाज अकोला चे कार्याध्यक्ष सुनील जानोरकर, कोषाध्यक्ष राजेंद्र मोहोकार, उपाध्यक्ष विनायकराव शेळके, सुरेश गाढे पाटील, सहसचिव विजय बोरकर, अविनाश पाटील,मेळाव्याचे प्रास्ताविक, संचलन, व आभार प्रदर्शन सचिव प्रदीप खाडे यांनी केले.

## २०२६ मधील एमपीएससी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

■अकोला,दि ९ (प्रतिनिधी) :

शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वर्ष २०२६ मधील नियोजित विविध स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा ही पूर्व परीक्षा ३१ मे २०२६ रोजी आयोजित केली जाईल. या परीक्षेचा निकाल अंदाजे ऑगस्ट २०२६ मध्ये अपेक्षित आहे. राज्य सेवा मुख्य परीक्षेतर्गत नागरी सेवा मुख्य परीक्षा १३ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होईल. या मुख्य परीक्षेचा निकाल अंदाजे फेब्रुवारी २०२७ मध्ये अपेक्षित आहे. महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २४ जून २०२६ रोजी तर, मुख्य परीक्षा ५ डिसेंबर २०२६ रोजी नियोजित आहे. महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा १२ जुलै २०२६ रोजी तर, मुख्य परीक्षा १३ डिसेंबर २०२६ रोजी नियोजित आहे.

राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२५ ही २९ मार्च ते २३ एप्रिल २०२६ पर्यंत होईल. महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा २०२५ ही ५ ते ९ मे २०२६ पर्यंत होणार तर महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा व कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२५ ही १६ मे २०२६ रोजी तर महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२५ ही १६ मे २०२६ रोजी होणार आहे.

